# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४५/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रमोद मोहन गावडे,<br>मु.पो. देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, विटा, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, किर्लोस्करवाडी , जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. प्रमोद मोहन गावडे, मु.पो. देवराष्ट्रे, ता. कडेगांव जि. सांगली. यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी किर्लोस्करवाडी उप विभाग, विटा विभाग यांचे विरुध्द तक्रार दि. २९.११.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २५.११.२०१० रोजी अर्ज केला व दि. १८.३.२०११ रोजी चलन भरुन चाचणी अहवाल दि. २५.४.२०११ रोजी दिला, तरीही त्यांना वीज जोडणी देण्यात आली नाही. म्हणून वीज जोडणी मिळावी यासाठी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली, त्यानंतर मंचाकडे धाव घेतली. वीज जोडणी मिळावी व विलंबाबद्दल नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि.२२.१२.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने दि. १८.३.२०११ ला चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दि. २५.४.२०११ रोजी दिला असल्याचे मान्य केले आहे. ग्राहकाची विहीर व शेत जमीन ताकारी कालव्या नजिक असून सदर काळात तेथील जमिनीत पाणी झिरपून दलदल निर्माण झाली आहे. त्यामुळे पोल उभा करणेस अशी परिस्थिती योग्य नाही. तरी ताकारी कालव्याचे पाणी बंद झाल्यानंतर सदर काम विना विलंब करणेत येईल. तरी सदर अर्जाच्या विलंबापोटी मागितलेली भरपाईबद्दल माफी मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि.२७.१२.२०११ रोजी घेतली असतां, तक्रारदार स्वतः उपस्थित. वितरण कंपनीतर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. व्हनमाने, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी ग्राहकाचे १ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम आहे, ग्राहकाने चलन भरले आहे, चाचणी अहवाल दिला आहे असे सांगितले. अधिकाऱ्यांच्या बदलीमुळे कामास विलंब झाल्याचे सांगितले. तसेच पाटबंधारे विभगामार्फत पाटातून शेतीसाठी पाणी पुरवठा होतो, चिखल होतो त्यामुळे काम करणे अवघड होते असे सांगितले. परंतु ग्राहकाने चिखल होत नाही, मंचाने खात्री करुन घ्यावी असे सांगितले. श्री. व्हनमाने यांनी ग्राहकास दि. ३१.१२.२०११ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर सांगितले. त्याप्रमाणे दि. ३.१.२०१२ रोजी वि.प.चा अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला, त्यामध्ये तक्रारदाराचे शेतीपंपाचे कनेक्शन दि. ३०.१२.२०११ रोजी १ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण करुन जोडून देण्यात आले आहे असे म्हटले आहे. त्यामुळे कनेक्शनच्या विलंबापोटी ग्राहकाने मागितलेली भरपाईची माफी मिळावी अशी विनंती केली आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

## कारणमिमांसा

ग्राहकाचे वितरण कंपनीकडे दि. २५.११.२०१० रोजी शेतीपंप नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला. ग्राहकाचे अंदाजपत्रक दि. ८.३.२०११ रोजी मंजूर झाले म्हणजे मंजुरीस निश्चितपणे विलंब झाला आहे. ग्राहकाने दि. १८.३.२०११ रोजी चलन भरले व चाचणी अहवाल दि. २५.४.२०११ दिला. क्षणभर अधिकाऱ्यांच्या बदलीमुळे विलंब झाला असे मान्य केले तरी ग्राहकाने त्वरीत कोटेशन भरुन चाचणी अहवाल देऊनही त्यास वीज जोडणी दिली नाही, त्याबद्दलचा खुलासा केला नाही.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तसेच ग्राहकाची विहीर व शेत जमीन ताकारी कालव्या नजिक असून सदर काळात तेथील जमिनीत पाणी झिरपून दलदल निर्माण झाली आहे, त्यामुळे पोल उभा करणेस अशी परिस्थिती योग्य नाही. तरी ताकारी कालव्याचे पाणी बंद झाल्यानंतर सदर काम विना विलंब करणेत येईल असे म्हटले आहे, परंतु त्याबद्दल कुठलाही पुरावा दिला नाही किंवा पाटबंधारे विभागाचे पत्र किंवा कागदपत्र मंचासमोर हजर केली नाहीत. पाटबंधारे विभागामार्फत पाटातून शेतीसाठी पाणी पुरवठा होतो असे मंचासमोर सांगितले. तक्रारदाराचे शेतीपंपाचे कनेक्शन दि. ३०.१२.२०११ रोजी १ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण करुन जोडून देण्यात आले आहे असे म्हटले आहे. या ठिकाणी वीज जोडणीचे काम उशीराने केले आहे, त्यामुळे ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाई मंजूर करणेत येत आहे. वि.प.चे सहाय्यक अभियंता, किर्लोस्करवाडी यांनी दि. ३१.१२.२०११ चे पत्र क्र. १०५५६ नुसार ग्राहकास ३०.१२.२०११ रोजी कनेक्शन दिले असल्याचे कळविले आहे परंतु कार्यपूर्ती अहवाल दाखल केला नाही. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

ग्राहकाचे आपल्या परिशिष्ट अ अर्जामध्ये वीजजोडणी मिळावी व नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. ग्राहकाने मंचाकडे दि. २९.११.२०११ रोजी केलेल्या अर्जात सुडबुध्दीने वीज कनेक्शन मिळणे पासून वंचित ठेवण्यात आले आहे. तरी तेथील अधिकाऱ्यांना सूचना देऊन कनेक्शन देण्यात यावे व यांचे सुडबुध्दीने वागणेमुळे माझे झालेली नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. या ठिकाणी असे म्हणता येईल की ग्राहकाने वीज जोडणीस झलेल्या विलंबापोटी भरपाई मागितलेली नाही. ग्राहक नुकसान नेमके कोणते झाले हे सिध्द करु शकला नाही. वीज जोडणी न मिळाल्याने नुकसान झाल्याबद्दलचा ग्राहकाने देणे आवश्यक होते.वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे दि. ३१.१२.२०११ पूर्वी तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी दिली आहे. त्यामुळे ग्राहकाची भरपाईची मागणी नामंजूर करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे. मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## **आदेश**

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराची वीज जोडणीची मागणी पूर्ण झाली असल्याने वीज जोडणी देण्याचे वेगळे आदेश करण्याची आवश्यकता नाही. परंतु वितरण कंपनीने कार्यपूर्ती अहवाल मंचास त्वरित दाखल करावा.

३) तक्रारदार ग्राहकाची नुकसान भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com